दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २२८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१३ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# आघाडी सरकारनेही पेट्रोल, डिझेलवरील करात कपात करावी : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र सरकारने पेट्रोल डिझेल उत्पादन कर कमी करून ग्राहकांना दिलासा दिल्यामुळे आता राज्य सरकारने पेट्रोल, डिझेल वरील व्हॅट व अन्य कर कमी करावेत, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाकडे केली आहे. या संदर्भात भापच्यावतीने आज (दि. १२) तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन देताना भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, सभागृहनेते परेश ठाकूर, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा वर्षा नाईक, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, गौरव कांडपिळे, सुहासिनी केकाणे, अभिषेक भोपी, यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. तसेच यावेळी राज्य सरकारच्या निष्क्रिय कारभाराचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.



या निवेदनात म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पेट्रोल व डिझेलवरील करात अनुक्रमे पाच व दहा रुपयांनी कपात केली आहे. राज्यातील महाविकास आघाडी सरकारने केंद्र सरकारचे अनुकरण करत व्हॅट व अन्य करत कपात करून जनतेला दिलासा दिला पाहिजे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी पेट्रोल – डिझेल दरवाढीविरोधात सातत्याने आंदोलने केली होती. त्यामुळे आता केंद्राने इंधनावरील करात कपात केल्यानंतर आघाडी सरकारने इंधनावर लावलेले सर्व प्रकारचे कर कमी करावे , अशी सामान्य माणसाची अपेक्षा आहे. मात्र इंधन दरवाढीविरोधात आंदोलन करताना केंद्र सरकारला दूषणे देणाऱ्या आघाडी सरकारमधील घटक पक्षांनी राज्य सरकारच्या करात कपात करण्यासाठी अजून हालचाली केल्याचे दिसले नाही. यावरून आघाडी सरकारमधील घटक पक्षांचे आंदोलन हे केवळ ढोंग होते, असेच सिद्ध होते. भारतीय जनता पार्टीची सत्ता असलेल्या राज्य सरकारांनी करात तातडीने कपात केली आहे. देशातील २२ राज्ये / केंद्रशासित प्रदेशांनी आपल्या करात कपात करून पेट्रोल डिझेलच्या दरात जन–तेला आणखी सवलत देऊन मोठा दिलासा दिला आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील सरकारनेही जबाबदारीने वागत आपल्या करात कपात करावी, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# मोदी सरकार देशवासीयांना 'शॉक' देण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गेल्या अनेक महिन्यांपासून इंधनाच्या दरात सातत्यानं वाढ होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनता मेटाकुटीला आली आहे. गेल्याच आठवड्यात केंद्र सरकारनं पेट्रोल, डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला. मात्र यानंतरही महागाई कमी झालेली नाही. महागाईमुळे सर्वसामान्यांचं बजेट बिघडलेलं असताना आता आणखी एक मोठा झटका बसणार आहे.

वीज निर्मिती करणाऱ्या देशा–तील कंपन्या आणि ऊर्जा वितरण करणाऱ्या कंपन्या (डिस्कॉम) आर्थिक संकटातून जात आ–हेत. देशातील ऊर्जा क्षेत्राची स्थिती वाईट आहे. भारत मोठ्या प्रमाणात कोळसा आयात करतो. देशात तयार होणारी वीज मुख्यत्वे कोळशापासूनच तयार होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर वाढल्यास ऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचा खर्चदेखील वाढतो. गेल्या महिन्यात देशात कोळशाचा तुटवडा निर्माण झाला होता. त्यानंतर ऊर्जा मंत्रालयानं ऑटोमॅटिक पास–थ्रू मॉडल संदर्भात आदेश जारी केला आहे.

ऑटोमॅटिक पास–थ्रू मॉडल अंतर्गत फ्युचर कॉन्ट्रॅक्टनंतर इंधनाचा दर वाढल्यास सरकारी डिस्कॉमवर अतिरिक्त ओझं पडेल. डिस्कॉमला ऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना करारापेक्षा जास्त रक्कम द्यावी लागेल. यामुळे ऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपन्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कारण त्यांना वाढलेल्या खर्चानुसार पैसे मिळतील. मात्र सरकारच्या निर्णयामुळे ऊर्जा वितरण कंपन्यांची स्थिती आणखी बिघडू शकते.



डिस्कॉमकडे ऊर्जेच्या वितरणाची जबाबदारी आहे. डिस्कॉम वीज पुरवठा करून त्या बदल्यात शुल्क आकारतं. इंधन दरात वाढ झाल्यास डिस्कॉम वीज खरेदी करताना ऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना अधिक रक्कम देईल. मात्र राजकीय दबाव आणि जनतेचा विरोध पाहता विजेचा दर वाढवणं अवघड असेल. मात्र डिस्कॉमला नाईलाजानं वीजेचा दर वाढवावा लागेल. त्याचा फटका थेट सर्वसामान्यांना बसेल.

## संक्षिप्त...

### ईडीच्या कोठडीत छळ ; अनिल देशमुखांच्या वकिलाचा युक्तिवाद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुखांच्या ईडी (अंमलबजावणी संचालनालय) कोठडीत पुन्हा कोर्टाकडून वाढ करण्यात आली आहे. ईडीने पुढील चौकशीसाठी देशमुखांची कोठडी वाढवून मागितली होती. ईडीच्या कोठडीला विरोध करत अनिल देशमुखांच्यावतीने जोरदार युक्तिवाद देखील केला गेला. तरी देखील ईडीने आणखी ३ दिवसांची कोठडी वाढवून मागितली.

युक्तिवादावेळी ईडीने अनिल देशमुखांची कोठडी चौकशीसाठी नको, तर केवळ त्यांचं स्टेटमेंट रेकॉर्ड करायचं आहे, अशी माहिती दिली. दरम्यान, दरदिवशी ८–९ तास चौकशी करून देशमुखांचा ईडी कोठडीत छळ सुरू आहे. त्यांना मानसिकरित्या त्रास दिला जात आहे, असा युक्तिवाद अनिल देशमुखांच्यावतीने ज्येष्ठ वकील विक्रम चौधरी यांनी केला.

जर बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझेचं स्टेटमेंट दुसऱ्या कोठडीत असताना घेता येतं, तर मग देशमुखांचं का नाही घेता येत? असा युक्तिवाद करत अनिल देशमुखांच्या वकिलांनी ईडी कोठडीला विरोध केला. सचिन वाझे आणि परमबीर सिंग यांना अद्याप अटक का नाही केली? मी चौकशीसाठी हजर झालो आणि मला अटक झाली असल्याचं अनिल देशमुखांच्यावतीने ज्येष्ठ वकील विक्रम चौधरी यांनी सांगितलं.

सुनावणीच्या सुरुवातीला अनिल देशमुखांनी कोर्टाला एक पत्र दिले. हे पत्र देशमुखांनी हाताने लिहिलं आहे. देशमुखांनी या पत्रात मला ईडीच्या रिमांडमध्ये १० दिवस झाले. २०० हून अधिक प्रश्न मला विचारून झाले. आता माझ्याकडे सांगण्यासारखं काहीही शिल्लक नाही. त्यामुळे आता पुन्हा ईडी कोठडी वाढवून देऊ नये असे नमूद करून विनंती केली.

# जागतिक पातळीवरील पुरस्कार महाराष्ट्राला देण्यात आला ही विरोधकांना एक चपराक : ना.सुभाष देसाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल शहर शिवसेना शाखेचा भव्य उद्घाटन सोहळा गुरुवारी सायंकाळी ०६ वाजता शिवसेना नेते व संपर्क नेते कोंकण विभाग तथा उद्योग व खनिकर्म मंत्री (महाराष्ट्र राज्य) ना.सुभाष देसाई यांच्या हस्ते तर मावळ लोकसभा खासदार श्रीरंग आप्पा बारणे, रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत, जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन शिवसेनेचे पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल आणि उपमहानगर प्रमुख–पनवेल/नवीन पनवेल यतीन देशमुख यांनी केले आहे. यावेळी बहुजन समाज पार्टीचे पनवेल तालुकाध्यक्ष शंकर सोन–वले यांच्यासह १०० पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचे शिवबंधन मनगटावर बांधले.



या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभलेल्या नेत्यांमध्ये जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील (रायगड जिल्हा सल्लागार), सौ.रेखाताई ठाकरे (रायगड जिल्हा संघटिका), रमेश गुडेकर(रायगड जिल्हा सल्लागार), रामदास पाटील (उपजिल्हाप्रमुख रायगड), भरत पाटील (तालुका संघटक पनवेल), रामदास शेवाळे (महानगरप्रमुख पनवेल), प्रथमेश सोमण (महानगर संघटक) मयुर जोशी(जिल्हा अधिकारी युवासेना), शिरीष बुटाला (रायगड जिल्हा सल्लागार), सौ.कल्पना पाटील (उपजिल्हा संघटिका पनवेल), सौ.रेवती सकपाळ (विधानसभा संघटिका पनवेल), परेश पाटील (उपजिल्हा संघटक पनवेल), अवचित राऊत(उपजिल्हा अधिकारी युवासेना), यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती दर्शविली.

यावेळी मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री सुभाष देसाई म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री हे अन्याय सहन करणारे मुख्यमंत्री बिलकुल नाहीत, तर त्यांचे नेतृत्व आणि त्या नेतृत्वाचे कौतुक अनेक ठिकाणांहून करण्यात आले. ही बाब एक महाराष्ट्र वासिय म्हणून आपल्याला अभिमानास्पद आहे. पनवेलमधील पाण्याचा प्रश्न, मालमत्ता कर या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहेच पण त्याहून अधिक प्रयत्नशील हे स्वतः मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे राहतात. थक्ज या संस्थेच्या माध्यमातून उद्धव ठाकरे सरकारचे विशेष अभिनंदन करून जागतिक .../२

# स्थलांतरित पक्षांना हुसकावण्यासाठी गवताला आग

**दै.रायगड नगरी । उरण**

जैवविविधतेने नटलेल्या आणि फ्लेमिंगोच्या आगमनाने गुलाबी झालेल्या पाणजे येथिल समुद्र किनाऱ्यांचे काँक्रीटच्या जंगलात रूपांतर करण्यासाठी काही समाज कंटकानी येथिल पाणथळी जवळील व या पक्षांचे आश्रयस्थान असलेल्या गव–ताळ आणि झाडा – झुडपांना आग लावून येथिल पक्ष्यांना हुसकावण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे येथिल जैव विविधता आणि पक्ष्यांचे निवास धोक्यात आले असल्याचे पर्यावरणवाद्यांनी सांगितले.

दोन दिवसांपूर्वी या येथिल गवताला आणि झाडा झुडपांना आग लावण्याचा प्रकार घडला होता. नॅटकनेक्ट फाऊंडेशन आणि श्री एकविरा आई प्रतिष्ठानने या बाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यांनी तातडीने पर्यावरण प्रधान सचिव मनीषा पाटणकर म्हसकर यांना या समस्येकडे लक्ष देण्यास सांगितले. सिडकोने नवी मुंबई एसईझेडला वेटलँड दिल्याचा भाडेतत्त्वाचा करार रद्द करण्याची विनंती नॅटकनेक्टतने ठाकरे यांना केली असून मुख्यमंत्र्यांनी नगरविकास खात्याला याची तपासणी करण्यास सांगितले आहे.

नॅटकनेक्टंचे संचालक कुमार म्हणाले, दहा दिवसांपेक्षा कमी कालावधीत मुख्यमंत्र्यांकडे आलेली ही तिसरी तक्रार आहे आणि या सर्व तक्रारी पर्यावरण विभागाकडे कारवाईसाठी पाठवण्यात



# कोरोना काळातील विकासाचा बॅकलॉग भरून काढत जनतेला अपेक्षित असणारी कामे पूर्ण करू : आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापण होताच काही कालावधीत कोरोनाचा महाभयंकर संकट ओढवला आणि विकासाचे कामांना खीळ बसली यात दिड ते दोन वर्षे वाया गेली असली तरी आता हळूहळू अनलॉक होत असल्याने रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात कोरोना काळातील थांबलेला विकासाचा बॅकलॉग आम्ही भरून काढत जनतेच्या मनातील विकास कामे पुर्ण करणार असल्याचे राज्य मंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे यांनी म्हसळा तालुक्यातील खाडी विभागात शासन दरबारी मंजूर केलेल्या कामांचे भूमिपूजन कार्यक्रमाला संबोधित करताना व्यक्त केले.

मंजूर विकास कामे दर्जेदार आणि जनतेला अपेक्षित असतील अशा पद्धतीने करावीत अशा सुचना पालकमंत्री आदिती तटकरे यांनी संबंधीत बांधकाम अभियंता आणि पक्षाचे पदाधिकाऱ्यांना दिल्या. रायगड जिल्हा परिषद आणि स्थानिक विकास आमदार फंडातुन सुमारे एक कोटी रुपये खर्चाचे मंजुर केलेल्या मौजे पाष्टी, कुडगाव, फळसप, संदेरी, आंबेत येथील गाववाडी वस्तीतील विकास कामांचे भूमिपूजन पालकमंत्री आदिती तटकरे यांचे हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांच्या समावेत पक्षाचे जेष्ठ नेते अलिशेठ कौचाली, प्रदेश उपाध्यक्ष .../२

# एक दिवसीय स्त्री जातीचे अर्भक फेकून दिले

## सापडलेल्या त्या नवजात बालकाचा उपचारादरम्यान मृत्यू

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील वदप गावाशेजारी एक दिवसीय स्त्री जातीचे अर्भक टाकून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून या बाळाचा उपचार दरम्यान मृत्यू झाल्याचे समजतंय.तर याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात अज्ञात माता पिता विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध कर्जत पोलीस करत आहेत.

कर्जत तालुक्यातील वदप गावातील आदिवासी वाडीजवळ, पडीक भिंतीच्या शेजारील झुडपात,९ नोव्हेंबर रोजी एक दिवसीय स्त्री जातीचे असलेले मूल गोंनपाटाच्या पिशवीत गुंडाळलेल्या स्थितीत स्थानिक ग्रामस्थांना आढळून आले होते. यावेळी लागलीच ग्रामस्थांनी कर्जत पोलिसांनी माहिती देण्यात आली होती. घटनास्थळी कर्जत पोलीस हजार होत, त्या नवजात बालकाला उपचारासाठी प्रथम कर्जत उपजिल्ह्या रुग्णालयात नेण्यात आले होते, परंतु बाळाची प्रकृती चिंताजनक वाटत असल्याने पुढील उपचारासाठी डॉक्टरांनी उल्हासनगर येथील सेंट्रल रुग्णालयात हलवले होते. अखेर रुग्णालयात उपचारादरम्यान या नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची माहिती आता समोर आली आहे. तर या नवजात बालकाला त्याच्या जन्माच्याच दिवशी त्याच्या माता पित्याकडून टाकण्यात आल्याचं समोर आलं.




एकंदरीत मातृत्वाला काळिमा फासणारी घटना कर्जत तालुक्यात घडली.तर त्या अज्ञात माता पित्याच्या विरोधात कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला.तर त्या मातेचा शोध कर्जत पोलीस ठाणे घेत असून कोणाला याबाबत काही माहिती मिळाली असेल तर ती .../२

# दहशतवादाचे आव्हान

तालिबानच्या सत्तेखालील अफगाणिस्तानने जगासमोर अनेक आव्हाने निर्माण केली असून, त्यांना सामोरे जाण्यासाठी प्रादेशिक आणि जागतिक स्तरावर व्यापक धोरणांची गरज आहे. अफगाणिस्तानातील कट्टरपंथीयांची वाढती दहशत, तालिबानींच्या क्रौर्यामुळे त्रस्त झालेली अफगाणी जनता आणि आतापर्यंत या देशाला होत असलेल्या मदतीत पडलेला खंड यांमुळे ही आव्हाने गुंतागुंतीची आहेत. अमेरिकेने काढता पाय घेतल्यानंतर अफगाणिस्तानवर तालिबानने कब्जा मिळविला असला, तरी तिथे अराजकता आहे. तालिबानद्वारे आपली धोरणे राबवित स्वार्थ साधण्यासाठी पाकिस्तान करीत असलेला प्रयत्न आणि त्याला चीनचा मिळत असलेला पाठिंबा यांमुळे; तसेच दहशतवाद्यांना थारा मिळत असल्यामुळे भारतासमोरील संरक्षण आव्हानेही वाढली आहेत. या पार्श्वभूमीवर अफगाणिस्तानातील स्थितीबाबत आणि त्याच्या उपखंडावरील परिणामांबाबत या टापूतील सर्व देशांनी चर्चा करणे गरजेचे आहे. भारत-अफगाणिस्तान या टापूतील देशांच्या सुरक्षा सल्लागारांची भारताने आयोजिलेली बैठक म्हणूनच महत्त्वाची होती. रशिया, इराण यांसह कझाकस्तान, किर्गिझिस्तान, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान आणि उझबेकीस्तान या देशांच्या प्रतिनिधींनी या बैठकीत सहभागी होऊन, सुरक्षा संवादात दाखवलेली एकजूट लक्षणीय आहे. या बैठकीचे आमंत्रण असूनही पाकिस्तान आणि चीन यांनी त्याकडे पाठ फिरवणे अगदीच धक्कादायक नाही. आपल्या इशाऱ्यावर नाचणारे सरकार अफगाणिस्तानात आणण्याचे आणि त्याद्वारे भारताच्या विरोधात सामरिक खोली वाढविण्याचे डावपेच पाकिस्तान खेळत आला आहे. १९९६ ते २००१ या काळात तालिबानची सत्ता असताना इस्लामाबादने हेच केले होते. या टापूवर आपले वर्चस्व निर्माण करण्याची खेळी चीन खेळत असल्याने, त्यानेही भारताच्या बैठकीत भाग घेतला नाही. या दोघांची अनुपस्थिती असली, तरी या परिषदेचे महत्त्व कमी होत नाही. अफगाणिस्तानबाबत आपली भूमिका महत्त्वाची असल्याचे भारताने या परिषदेद्वारे दाखवून दिले आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा सामना भारत गेल्या तीन दशकांपासून करीत आहे. अफगाणिस्तानात तालिबानी राजवट येण्याने दहशतवादाचा धोका आणखी वाढणार आहे. भारतालाच नव्हे, तर खुद्द अफगाणिस्तानलाही दहशतवादाचा धोका आहे. तालिबानने ताबा घेतल्यापासून गेल्या तीन महिन्यांत तेथील दहशतवादी हल्लयांत वाढ झाली असून, मूलतत्त्ववाद्यांचा वावरही वाढला आहे. भारताने आयोजिलेल्या बैठकीत हा मुद्दा प्राधान्यक्रमाने येणे स्वाभाविक होते. अफगाणिस्तानात दहशतवाद्यांना मिळणारा आश्रय त्या देशासाठीच नव्हे, तर संपूर्ण टापूसाठी धोकादायक असल्याकडे या बैठकीने लक्ष वेधले. बैठकीनंतर जारी करण्यात आलेल्या दिल्ली जाहीरनाम्यात हा मुद्दा प्राधान्यक्रमाने आला आहे. अफगाणिस्तानात दहशतवादाला आश्रय मिळू नये, त्यांना प्रशिक्षण आणि वित्तपुरवठा केला जाऊ नये, त्या भूमीतून कोणताही कट शिजला जाऊ नये, यासाठी दक्षता घेण्याची गरजही व्यक्त करण्यात आली आहे. त्याला आंतरराष्ट्रीय समुदायाने सकारात्मक प्रतिसाद देण्याची आवश्यकता आहे. अमेरिकेवरील ९/११ च्या दहशतवादी हल्लयाची सूत्रेही तालिबानी राजवटीतील अफगाणिस्तानातूनच हलली होती. अमेरिकेने फौजा माघारी घेतल्यानंतरच्या गेल्या काही महिन्यांतील घडामोडी चिंताजनक आहेत. हीच चिंता भारताच्या बैठकीत एकमताने व्यक्त झाली आहे. अफगाणिस्तानात खऱ्या अर्थाने तेथील लोकांचे प्रतिनिधित्व करणारे सर्वसमावेशक सरकार असावे आणि त्या देशाला विनाअडथळा मदत मिळावी, अशी हाकही या बैठकीने दिली आहे. अफगाणिस्तानात शांतता नांदणे, तिथे सुरक्षितता आणि स्थैर्य असण्यासाठी हा मुद्दा महत्त्वाचा आहे. यासह जाहीरनाम्यातील अन्य मुद्द्यांवर इराण आणि रशिया या दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षरी करण्याला वेगळा अर्थ आहे; कारण हे दोन्ही देश सुरुवातीला तालिबानच्या बाबतीत सकारात्मक होते. अमेरिकेबरोबर वितुष्ट असल्यामुळे त्यांनी ही भूमिका घेतली असावी; परंतु कालांतराने ते अधिक सावध झाले आहेत. तालिबानी राजवटीबाबत वाटणारी चिंता केवळ भारतापुरती मर्यादित नसल्याचे दिल्लीतील बैठकीतून स्पष्ट झाले आहे. अफगाणिस्तानचे सार्वभौमत्व आणि अखंडता यांचा आदर करतानाच तेथील अंतर्गत कारभारात कोणी बाहेरून हस्तक्षेप करू नये, हा या बैठकीतील मुद्दाही भूमिका सांगणारा आहे. पाकिस्तानला अफगाणिस्तानचे हित नव्हे, तर स्वतःचे वर्चस्व हवे आहे. भारताच्या विरोधात दहशतवाद्यांचे पालनपोषण करणाऱ्या पाकिस्तानलाही कट्टरतावाद्यांचे चटके बसले असले, तरी त्यापासून तो धडा घेण्यास तयार नाही. सध्या त्याला अफगाणिस्तानात संधी दिसत असून, तालिबानची स्वीकारार्हता जगभर वाढविण्यासाठी तो प्रयत्नशील आहे. या उद्देशानेच पाकिस्तान अफगाणिस्तानबाबत वेगळी बैठक आयोजित करीत असून, त्याला चीनची हजेरी असणार आहे. या पार्श्वभूमीवर अफगाणिस्तानबाबत भारताने प्रादेशिक टापूतील अन्य देशांबरोबर आपली भूमिका स्पष्ट केली, ते योग्यच झाले.

# झाडाझुडुपांचा विळखा ठरतोय धोकादायक

## साळाव-मुरुड रस्त्यावरील साईडपट्ट्या साफ करण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

साळाव-मुरुड रस्त्याला गेल्या अनेक दिवसांपासून असलेला झाडाझुडुपांचा विळखा धोकादायक ठरत असून या रस्त्याच्या साईड पट्ट्या साफ करण्याची मागणी प्रवासी व वाहनचालक यांच्या वतीने मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायतीचे सरपंच चेतन जावसेन व उपसरपंच मतीन सौदागर यांनी केली आहे.

मुरुड जंजिरा, काशिद बीच पर्यटनात मागील आठवड्यापासून या रस्त्यावर पर्यटकांची रेलचेल असून शनिवार रविवार वाहनांच्या दुतर्फा रांगा लागलेल्या असतात.या रस्त्यावर अनेक ठिकाणी झाडाझुडुपांचा विळखा असल्याने तसेच अवघड वळणात समोरुन येणारे वाहन दिसत नाही. त्यामुळे वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

पावसाळ्यात खड्ड्यांच्या त्रासानंतर गेल्या अनेक दिवसांपासून साळाव - मुरुड रस्त्यावर अनेक ठिकाणी असलेल्या झाडाझुडुपांचा विळखा तसेच काही ठिकाणी खाली आलेल्या झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत असून याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षा बाबत नाराजीचा सूर दिसून येत असून रस्त्याच्या साईडपट्ट्या साफ करण्याची मागणी केली जात आहे.

साळाव-मुरुड रस्त्यावर कोर्लई, बोर्ली मांडला, बारशिव, काशिद, नांदगाव, मोरे, विहूर, राजवाडा ते कोटेश्वरी मंदिरा दरम्यान रस्त्या लगत असलेल्या झाडाझुडुपांमुळे काही ठिकाणी समोरुन येणारे वाहन दिसत नसल्याने वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही तसेच काही ठिकाणी रस्त्यावर झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने यात दखल घेऊन साळाव - मुरुड रस्त्यावरील साईडपट्ट्या साफ करण्याची मागणी प्रवासी व वाहनचालक यांच्या वतीने सरपंच चेतन जावसेन व उपसरपंच मतीन सौदागर यांनी केली आहे.

# कमळ नागरी सह.पतसंस्था तळा येथे ग्राहक दिन साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य असलेली कमळ नागरी सह.पतसंस्था अलिबाग यांच्या वतीने तळा शाखेत ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे संस्थापक गिरीश तुळपुळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कमळ ग्राहक दिन म्हणून साजरा केला जात आहे.

अध्यक्ष सतीशचंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मोरेश्वर स.दातार यांच्या हस्ते ग्राहकांना गुलाब पुष्प व पेढा देऊन सन्मान करण्यात आला. हा एक ग्राहकांचा सन्मानच आहे. निमित्त जरीवाढदिवसाचे औचित्य असले तरी ग्राहक दिनाचे आयोजन केले जाते. इतर बँका किंवा पतसंस्था मधून साजरा केला जात नसल्याने ग्राहकांना समाधान आहे अशी प्रतिक्रिया ग्राहकांमधून दिली जात असून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

तळा शाखेला ९ वर्ष झालीअसून ग्राहकांनी विश्वास ठेवला आणि आम्ही जोपासला आहे. त्यामुळे प्रतीवर्षी यशाचा वाढता आलेख पहायला मिळत आहे. ठेवीदारांनी मोठ्या प्रमाणात ठेवी ठेवाव्यात व कर्जदार ग्राहकांनी वेळेत हप्ते भरणे हे आवश्यक आहे. तळा शाखेची ३१ऑक्टो.२१ ची आर्थिक स्थिती ०% एन पी ए आहे. २.७८लक्ष ठेवी ३.८८ लक्ष कर्ज एकत्रित व्यवसाय ६.६६ लक्ष अशी आर्थिक स्थिती असून सहकार्य करावे असे आवाहन केले.





गेली तीन वर्षा पासून ग्राहक दिन साजरा करीत आहे अशी माहिती व्यवस्थापक वैभव करबंत यांनी सांगितले यावेळी शाखा व्यवस्थापक वैभव करबंत जेष्ठ लिपिक योगेश बर्वे, अस्मिता पितळे, मदतनीस युसुफ कुरूक्कर व ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## विरोधकांना एक चपराक : ना.सुभाष देसाई

पातळीवरील पुरस्कार महाराष्ट्राला देण्यात आला ही विरोधकांना एक चपराक असणार आहे. येणाऱ्या काळात बाळासाहेब ठाकरे रोजगार मेळावा आखला जाणार असून त्याच्यासोबत मुख्यमंत्री स्वयंरोजगार योजना देखील आखली जाणार आहे. रोजगार तर मिळावा पण रोजगार देणारे म्हणून उदयास या असे या योजनेचे द्योतक असणार आहे. येणाऱ्या सर्व काळामध्ये महाराष्ट्र कधी थांबलाच नाही आणि यापुढेही कधीही थांबणार नाही, असेही त्यांनी सांगून आपले प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना रायगड जिल्ह्याचे सल्लागार बबनदादा पाटील यांनी सांगितले की, सुभाष देसाई यांनी शिवसेनेच्या मराठी भाषेला न्याय देण्यासाठी विशेष लढा आपल्या जबाबदारीतून त्यांनी दिला आहे आणि मराठी भाषेला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या मुख्यमंत्र्यांचं नाव संपूर्ण देशात गाजतय आणि त्याच कौतुक दस्तुरखुद्द सुप्रीम कोर्टाने केले आहे. आयोजकांनी यावेळी ज्या समस्या मांडल्या त्या पनवेलच्या जनतेच्या हिताच्या आहेत, आणि या विषयावर आपण पक्षाचे ज्येष्ठ नेते म्हणून सुभाष देसाई यांनाही यामध्ये लक्ष घालण्याची विनंती त्यांनी केली. तसेच आज महाविकास आघाडी सरकारने येथील शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक निर्णय घेतले आहेत. नगरविकास मंत्र्यांनी महापालिका क्षेत्रातील नागरिकांचा मालमत्ता कर घेवू नका असे आदेश दिले. असेही त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सांगितले की, एमआयडीसी परिसरातील गावांचा पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आहे. लोकांची कामे करणारे शिवसैनिक आम्ही आहोत. पनवेल महानगरपालिकेने उद्यानांवर कोटींच्या घरात टेंडर काढत आहेत. आणि आपल्या ठेकेदारांचे भले करून मनमानी करत आहेत. शिवसेना शाखा उद्घाटन सोहळ्यावर बोलताना त्यांनी सांगितले की, आज शिवसेनेची शाखा उद्घाटन सुरू झाली नाही तर ते मंदिर आहे. आणि जनतेने या मंदिरात आपल्या अडचणी सांगितल्यानंतर त्या मंदिरातील पुजाऱ्याने त्या अडचणी सोडविण्यासाठीचे हे मंदिर जनतेनेच असणार आहे.

## स्थलांतरित पक्षांना हुसकावण्यासाठी गवताला आग

आल्या आहेत, आणि वेळ निघून गेल्याने पाणथळ जागा वाचवण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलण्याची विनंती केली. नॅटकनेक्टनेही आगीच्या ताज्या घटनेकडे उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या खारफुटी संरक्षण आणि संवर्धन समितीचे लक्ष वेधले आहे.

वेटलँडची नासधुस करण्याचे हे न थांबणारे प्रयत्न चिंताजनक आहेत, असे श्री एकविरा आई प्रतिष्ठानचे प्रमुख नंदकुमार पवार यांनी म्हटले आहे. २८९-हेक्टर जागेसाठी पाण्याचा प्रवाह बंद केला जातो त्यामुळे येथिल मासे तसेच पशुपक्षी आणि जमिन कोरडी होते. ऑक्टोबर ते मे या कालावधीत सुमारे ५० प्रजातींचे देशी विदेशी पक्षी या पाणथळ प्रदेशात येतात.

हिवाळा संपेपर्यंत आणि पावसाळ्याची चाहूल लागेपर्यंत हे पक्षी इथेच थांबतात. मात्र काही समाजकंटक या पक्षांना हुसकावण्यासाठी आणि येथिल जमिन ताब्यात घेण्यासाठी अघोरी प्रयत्न करत आहेत. या बाबत रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांना देखिल या आगीचे फोटो पाठविण्यात आले असून त्यांनी आपल्या विभागाकडून या बाबत लक्ष घालण्यास सांगितले आहे.

## जनतेला अपेक्षित असणारी कामे पूर्ण करू : आदिती तटकरे

भास्करदाजी विचारे, तालुका अध्यक्ष समीर बनकर, ता.मुंबई अध्यक्ष महेश शिर्के, जिल्हा परिषदेचे कृषी सभापती बबन मनवे, पं.स. सभापती छाया म्हात्रे, उप सभापती संदीप चाचले, माजी सभापती नाझीम हसवारे, तहसीलदार समीर घारे, पीआय उध्दव सुर्वे, गट विकास अधिकारी वाय.एम.प्रभे, पा.पु.अभियंता युवराज गांगुर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी पालकमंत्री कु.आदीती तटकरे यांच्या हस्ते म्हसळा तालुक्यात विशेषतः खाडी विभागातील मौजे पाष्टी गौळवाडी येथे रस्ताभूमिपुजन, पाष्टी बौद्धवाडी बुद्धविहार भूमिपुजन, मांदाटणे येथे साठवण तलाव उद्घाटन, मौजे कुडगाव रस्ता भुमिपुजन, मौजे फळसफ येथे साकव भुमिपुजन, मौजै संदेरी बौद्धवाडी रस्ता भूमीपुजन, संदेरी बौद्धवाडी साकव भुमिपुजन, संदेरी मोहल्ला सामाजिक सभागृह भुमिपुजन, मौजे आंबेत वलजारवाडी रस्ताचे भुमिपुजन, आंबेत मोहल्ला रस्ताचे भुमिपुजन, आंबेत बौद्धवाडी अंतर्गत रस्ता भुमिपुजनाचे कार्यक्रम संपन्न झाले. याच वेळी पालकमंत्री तटकरे यांनी तब्बल ५ कोटी रुपये खर्च करून नवीन उभारण्यात आलेले आंबेत प्राथमिक आरोग्य केंद्र नविन इमारतीची पहाणी केली. लवकरच आंबेत येथील आरोग्य केंद्राचे लोकार्पण सोहळा संपन्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## एक दिवसीय स्त्री जातीचे अर्भक फेकून दिले


पोलिसांनी येऊन सांगण्याचे अवाहन देखील कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांनी माहिती देणारा याचे नाव कोणालाही न सांगण्याचा अटीवर माहिती द्यावी असे आवाहन केले आहे.

# धुळीत हरवली बोर्लीपंचतन बाजारपेठ

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - प्रत्येक शहराची ओळख तेथील सुस्थितीत रस्त्या पासूनच होते. मात्र, बोर्लीपंचतन शहराची प्रसिद्ध बाजारपेठ रस्त्यावरील खड्डयांमुळे धुळीत हरवली आहे. लोकप्रतिनिधीसंह सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष होत असल्याने तसेच किमान सुस्थितीतील रस्त्यांसारखी पायाभूत सुविधा न मिळाल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणून दिवेआगर गावाची ओळख आहे. याच पर्यटनाला जोडली गेलेली बोर्लीपंचतन शहराची एक ते दीड किलोमीटर अंतरात वसलेली मोठी बाजारपेठ आहे. बाजारपेठेतील मुख्य रस्त्याची सद्या दुरवस्था झालेली आहे. अनेक ठिकाणी मातीचे ढीग असतानाच खराब रस्त्यांमुळे पोहामिल नाका ते बसस्थानक परिसरात संपूर्णपणे धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे परिसरातील रहिवाशांबरोबर वाहनचालकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.



दरवर्षी पावसाळी रस्त्याभर झालेल्या खड्ड्यांची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होत असताना खडी, डांबर न वापरता माती व जांभा दगडाचा वापर करण्यात येतो. मोठ्या प्रमाणात वाहनांच्या वर्दळीचा रस्ता असल्यामुळे दोन ते तीन महिन्याच्या कालावधीतच रस्त्याला वापरलेल्या त्याच माती, जांभा दगडाची भुकटी तयार होऊन रस्त्याभर धुळीचे प्रमाण वाढले आहे. परिणामी येथील दुकानदार, व बाजारहाट करण्यासाठी आलेल्या नागरिकांना मुख्य रस्त्यानी चालताना नाक बंद करुन चालावे लागत आहे. अशा एक ना अनेक समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे.

दिवेआगर या प्रसिद्ध पर्यटन स्थळाला येणाऱ्या पुणे , मुंबई राज्यातील कानाकोपर्यातून पर्यटकांची संख्या लक्षणीय आहे, त्या पर्यटकांना खरेदीसाठी बोर्ली शहराकडे यावे लागते पण रस्त्याकडे पाहता ते देखील नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. रस्त्याभर धुळीचे साम्राज्य वाढल्याने शहराच्या दुतर्फा असलेले घर मालक व दुकानदार रस्त्यावर दिवसातून दोन ते तीन वेळा पाण्याचा ओलावा करुन धुळी पासून वाचण्याचा प्रयत्न करीत असतात.

बोर्लीपंचतन शहर ग्रामस्थांच्या वतीने वेळोवेळी रस्ता दुरुस्तीची व्यथा मांडण्यात आली. तरी हि सध्यस्थितीत रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था असल्याने प्रवाशी व पादचार्यांना रस्त्यावर चालताना खड्डे व धुळीने नको से करुन सोडले आहे. आपल्या शहराचा रस्ता सुस्थितीत लवकरच करावा अशी मागणी बोर्लीकरांकडून होत आहे.

पावसाळ्यात होणारा पाण्याचा निचरा गटारातून होणे आवश्यक आहे. मात्र, मान्सूनपूर्व होणारी विविध ठिकाणची सफाई नझाल्याने ते पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे. नुकतीच पावसाने विश्रांती घेतली आहे. आता उन्हाळ्यात रस्त्याची दुरवस्था वाढत असल्याने धुलीकणांमध्येही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. पण अस चालणार किती दिवस, आणि पुढे कसे होणार ? असे अनेक सवाल नागरिकांना भेडसावत आहेत. वाढलेल्या धुळीमुळे रस्त्यावरून जाताना समोर मोठे वाहन असले तर, उडणाऱ्या धुळीमुळे दुचाकीस्वार व पादचाऱ्यांच्या नाका-तोंडात तसेच डोळ्यात मोठ्या प्रमाणावर धूळ जात आहे. त्यामुळे अनेकदा अपघाताचे प्रसंगही घडत आहेत. नाका - तोंडावर हात ठेवून गाडी चालवायची, अशी परिस्थिती बोर्ली शहरात निर्माण झाली आहे. धुळीमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नागरिकांच्या घशाचे व श्वसनाचे आजार, डोळ्यांच्या विकारातही परिणाम जाणवेल. नेहमीच त्रास वाढल्याने भविष्यात त्वचारोगही होत जाणार. दमा व हृदयविकाराच्या रुग्णांसाठी धूळ धोकादायक ठरते. धुळीचा हा त्रास थांबविण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला सुरेश पोसतांडेल यांचा पाठींबा

**दै.रायगड नगरी । उरण**



राज्यात सुरु असलेल्या एसटी कर्मचारी आंदोलनामुळे प्रवाश्यांचे हाल होत आहेत.उरण बस डेपोतून सुटणाऱ्या दादर, पुणे शिर्डी, पेण, अलिबाग, पनवेल, ठाणे, आदी गाड्या बरोबर ग्रामीण भागात जाणाऱ्या बंद असल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. त्यामुळे खाजगी वाहनाची भाडे वाढ झाली आहे. प्रवाशांना जास्त पैसे मोजावे लागत आहेत.

एसटी कर्मचाऱ्यांचा विविध मागण्यांसाठी तसेच महामंडळाचे राज्यशासनामध्ये विलगीकरण करण्यासाठी एसटी कर्मचारी संघटनेमार्फत राज्यव्यापी आंदोलन सुरू करण्यात आले आहे या आंदोलनास महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुरेश पोसतांडेल यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. तसेच सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना कामगारांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे असे संगितले. याच पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील उरण एसटीडेपोमध्ये आज पाठिंबा दिला आहे. मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे असा सार्थ विश्वासही दिला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य नगर परिषद ,नगर पंचायत कर्मचारी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुरेश पोसतांडेल एसटीचे कर्मचारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-

शनिवार दि.१३ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ९.३० वा. सुतारवाडी ता.रोहा येथून शासकीय वाहनाने ता.श्रीवर्धनकडे प्रयाण. सकाळी ११.०० वा. श्रीवर्धन येथे आगमन व नगरपरिषदे अंतर्गत मिनी अग्निशमन शिघ्र कृती वाहनाचा लोकार्पण समारंभ. स्थळ : नगरपरिषद कार्यालय, श्रीवर्धन. दुपारी १२.०० वा. श्रीवर्धन येथून शासकीय वाहनाने दिवेआगरकडे प्रयाण. दुपारी १२.३० वा दिवेआगर येथे आगमन व विविध विकास कामांचे भूमिपुजन व उद्घाटन कार्यक्रम :-

दिवेआगर नं.१ ब्राम्हण समाज सामाजिक सभागृह भूमिपुजन कार्यक्रम, दिवेआगर नं.२ आगरी समाज सामाजिक सभागृह भूमिपुजन, दिवेआगर नं.३ कुंभार समाज सामाजिक सभागृह भूमिपुजन, दिवेआगर एस.टी.पिकअप शेड उद्घाटन समारंभ, दिवेआगर अंतर्गत रस्ता उद्घाटन समारंभ, दिवेआगर सुवर्ण गणेश मंदिराकडे जाणारा रस्त्याचे भूमिपुजन समारंभ. दुपारी २.०० वा. राखीव. दुपारी ३.०० वा. दिवेआगर येथून शासकीय वाहनाने ता.रोहाकडे प्रयाण.सायं. ५.०० वा. रोहा येथे आगमन व विशाल जेनेरिक मेडिकल स्टोअर्सचे उद्घाटन. स्थळ : डॉ. जाधव हॉस्पिटल शेजारी, रोहा-कोलाड-रोड, त्रिमूर्तीनगर, दमखाडी, ता.रोहा, सायं.५.३० वा. रोहा येथून शासकीय वाहनाने वरसगावकडे प्रयाण. सायं.६.०० वा. वरसगाव येथे आगमन व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत वरसगाव नळ पाणीपुरवठा योजनेचा लोकार्पण सोहळा व पद्मावती नगर ते कालवा रस्त्याचे उद्घाटन कार्यक्रम. सायं.७.०० वा. वरसगाव येथून शासकीय वाहनाने सुतारवाडीकडे प्रयाण. सायं.७.३० वा. सुतारवाडी येथे आगमन व राखीव.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे– शनिवार दि.१३ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ८.३० वा. शासकीय निवासस्थान ब–२ मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई येथून जुहू विमानतळ हेलिपॅड मुंबईकडे प्रयाण. सकाळी ९.३० वा. जुहू विमानतळ हेलिपॅड, मुंबई येथून हेलिकॉप्टरने आर. सी.एफ.मैदान हेलिपॅड थळ, अलिबाग, जि.रायगडकडे प्रयाण. सकाळी १०.०० वा.हेलिकॉप्टरने आर.सी.एफ.मैदान हेलिपॅड, थळ–अलिबाग येथे आगमन व मोटारीने राजमळा लोणारे अलिबागकडे प्रयाण. सकाळी १०.३० वा. अलिबाग तालुका शिवसेना मेळाव्यास उपस्थिती. स्थळ : आमदार महेंद्र दळवी यांचे निवासस्थान, राजमळा लोणारे अलिबाग. सकाळी ११.५० वा. लोणारे अलिबाग येथून मोटारीने आर. सी.एफ.मैदान हेलिपॅड थळ, अलिबागकडे प्रयाण. दुपारी १२.०० वा. आर.सी.एफ.क्रीडा संकुल हेलिपॅड थळ–अलिबाग येथून हेलिकॉप्टरने जे.एस.डब्ल्यू.डोलवी हेलिपॅड पेणकडे प्रयाण. दुपारी १२.२० वा. हेलिकॉप्टरने जे.एस. डब्ल्यू.डोलवी हेलिपॅड पेण येथे आगमन व मोटारीने आगरी समाज हॉल, पेणकडे प्रयाण. दुपारी १२.३० वा. पेण तालुका शिवसेना मेळाव्यास उपस्थिती. स्थळ : आगरी समाज हॉल, पेण, जि.रायगड दुपारी २.०० वा. आगरी समाज हॉल पेण येथून मोटारीने जे.एस.डब्ल्यू.डोलवी हेलिपॅड पेणकडे प्रयाण. दुपारी २.१५ वा. जे.एस.डब्ल्यू.डोलवी हेलिपॅड पेण येथून होलिकॉप्टरने माझदा हेलिपॅड, रोहाकडे प्रयाण. दुपारी २.४५ वा. हेलिकॉप्टरने माझदा हेलिपॅड, रोहा येथे आगमन व मोटारीने ज्येष्ठ नागरिक सभागृह, रोहाकडे प्रयाण. दुपारी ३.०० वा. रोहा तालुका शिवसेना मेळाव्यास उपस्थिती. स्थळ : ज्येष्ठ नागरिक सभागृह, रोहा. सायं. ४.३० ज्येष्ठ नागरिक सभागृह, रोहा येथून मोटारीने माझदा हेलिपॅड, रोहाकडे प्रयाण. सायं.४.४५ वा. माझदा हेलिपॅड, रोहा येथून हेलिकॉप्टरने रत्नागिरीकडे प्रयाण.

# मनसेच्या पालिका कामगार कर्मचारी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आयुक्तांची भेट

दै.रायगड नगरी । पनवेल



मनसेच्या महापालिका कामगार कर्मचारी सेना पनवेल विभागाच्या पदाधिकाऱ्यांची नुकतीच नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेनेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेतली. पनवेल महानगरपालिकेसाठी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीला सहकार्य करण्याबाबतचे निवेदन आयुक्त गणेश देशमुख यांना देण्यात आले. यावेळी मनसे रायगड जिल्हाध्यक्ष अतुल भगत, पनवेल शहराध्यक्ष संजय मुरकुटे, कामोठे शहराध्यक्ष रोहित दूधवडकर, नवनिर्वाचित कार्यकारिणी अध्यक्ष प्रसाद परब, कार्याध्यक्ष राम जाधव, सरचिटणीस नितीन काळे, कोषाध्यक्ष आतिष म्हामुनकर, उपाध्यक्ष मनोज कोठारी, उपाध्यक्ष रोहित कोरडे, कार्यकारिणी सल्लागार आप्पासाहेब कोठोहे, रायगड जिल्हा महिला अध्यक्षा आदिती सोनार यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी मनसेचे रायगड जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांनी बोलताना सांगितले की, महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कर्मचारी संघटनेचे एक युनिट पनवेल महानगरपालिकेमध्ये स्थापन झाले आहे. या अनुषंगाने पनवेल महापालिका आयुक्तांची सदिच्छा भेट घेऊन कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत सहकार्य अपेक्षित असल्याबाबतची मागणी करण्यात आली. यावर आमचे कायम सहकार्य असेल असे आयुक्तांनी सांगितले. ज्या मान्यताप्राप्त संघटना पनवेल महानगरपालिकेमध्ये काम करतात, त्यांच्या विरोधात कामगारांच्या मनात असंतोष आहे. कर्मचाऱ्यांचे कामाचे तास, पगारवाढ, आरोग्य सुविधा आणि पीएफ या संदर्भात सध्या सुसुत्रता दिसून येत नाही. यासंदर्भात आयुक्त आणि पालिकेचे पदाधिकारी यांनी दखल घ्यावी. ही सगळी मिलीभगत असून बहुतेक कर्मचारी कंत्राटी असल्यामुळे आमची नोकरी जाईल या भीतीमुळे मनसेच्या संघटनेचे सभासद होण्यास घाबरत असल्याचे दिसून येते. संघटनेचे सर्व पदाधिकारी पनवेल, नवीन पनवेल, खारघर, कामोठे, कळंबोली आणि ग्रामीण भागात जाऊन तेथील कंत्राटी कर्मचाऱ्यांना धीर देत आहेत. त्यांच्या समस्या त्यांनी मांडाव्यात, संघटनेचे सभासद नाही झालात तरीही चालेल, परंतु कार्यकारिणीला आपल्या समस्या सांगाव्यात. कामगारांच्या समस्यांचे निश्चितच निवारण करण्याचा आमच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल.


कार्यकारिणीचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रसाद परब हे म्हणाले की, आम्ही ग्रामपंचायत सदस्य म्हणुन काम केले आहे. आणि ग्रामपंचायतीमधील काही कर्मचारी कंत्राटी आणि काही कर्मचारी कायमस्वरूपी असे पनवेल महानगरपालिकेमध्ये कामासाठी लागले आहेत. या कर्मचाऱ्यांच्या बऱ्याच समस्या असून आम्ही सगळे कार्यकारिणीचे पदाधिकारी याबाबत कायम पाठपुरावा करत आलो आहोत. यासाठीच आम्ही पालिका आयुक्तांकडे युनियन फॉर्मेशनचे पत्र दिले आहे.

पालिका कर्मचारी पालिकेचे हातपाय आहेत, त्यामुळे त्यांच्या समस्या दुर झाल्या तर पालिकेचे काम आणि शहर सुद्धा व्यवस्थित राहील. त्यासाठी आम्ही कामगारांच्या कायम पाठीशी आहोत. युनियनची निर्मिती झाल्यानंतर आम्हाला याठिकाणी भेटलेल्या कर्मचाऱ्यांनी युनियनचे सभासद होण्याची इच्छा बोलुन दाखवली. या युनियनचे जास्तीत जास्त प्रमाणात सभासद व्हा. तुमच्या विश्वासाला तडा जाऊन देणार नाही याची खात्री देतो, असे महानगर पालिकेतील कर्मचाऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे.

# सुमित पाटील यांनी दिला उपसरपंच पदाचा राजीनामा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील महत्त्वाच्या असलेल्या पागोटे ग्रामपंचायतचे उपसरपंच सुमित चंद्रकांत पाटील यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा वरिष्ठांकडे दिला असून वरिष्ठांनी त्यांचा उपसरपंच पदाचा राजीनामा स्वीकारला आहे. त्यामुळे पागोटे ग्रामपंचायतीचे उपसरपंच पद आता पुन्हा रिक्त झाले आहे.



पागोटे ग्रामपंचायतचे उपसरपंच सुमित चंद्रकांत पाटील यांनी दिनांक ११/११/२०२१ रोजी ग्रामपंचायत सदस्य कामिनी किरण तांडेल यांच्या समक्ष आपला राजीनामा सरपंच मिलिन केशव तांडेल यांच्याकडे सुपूर्त केला आहे. सुमित पाटील यांनी दिनांक २२/१२/२०२० या दिवशी उपसरपंच पद स्वीकारला होता.त्या नंतर भार्गव पाटील यांच्या वर अविश्वास ठराव जनतेतून मान्य झाल्यावर दिनांक ०९/०२/२०२१ रोजी पासून ते ०३/११/२०२१ पर्यन्त प्रभारी सरपंच म्हणून कारभार सांभाळला. दैनंदिन जीवनातील व्यस्त कामकाजामुळे तसेच प्रत्येकाला उपसरपंच पदाची संधी मिळावी या दृष्टिकोनातून आपण उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याचे सुमित पाटील यांनी यावेळी सांगितले. यापुढे सामाजिक कार्यातून,विविध चळवळीतून आपण कार्यरत राहणार असल्याचेही सुमित पाटील यांनी यावेळी सांगितले.

मे.गोडसे मॅडम कोर्ट

अर्जदारतर्फे वकील प्रदीप टी. मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१६१४/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२२/१२/२०२१

१) श्री.प्रदीप तुकाराम मुंडकर
वय वर्षे : ४३, व्यवसाय : वकीली
२) श्री.संदीप तुकाराम मुंडकर
वय वर्षे : ४२, धंदा : नोकरी
३) सौ.संगीता अरुण परदेशी
वय वर्षे : ३८, धंदा : घरकाम
४) सौ.गीता लक्ष्मण गावंड
वय वर्षे : ४०, धंदा : घरकाम
अ.क्र.१ ते ४ सर्व रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.वनिता रोहिदास गोंधळी
वय वर्षे : ३६, धंदा : घरकाम
रा.मोठा खांदा, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

१) अर्जदार क्रं.१ व २ हे कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे मुलगे असून अर्जदार क्रं.३ ते ५ ह्या मुली आहेत.

२) कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचा मृत्यू दि.२१/०४/२०२१ रोजी, रुम नं.४०५, आर.एन.एव्हेन्यू बिल्डींग, सेक्टर क्रं.२ ए, प्लॉट नं.१३, करंजाडे नोड, (वडघर) येथे झालेला आहे. तसेच कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे पती कै.तुकाराम महादू मुंडकर यांचा दि.०५/०३/२०२० रोजी मृत्यू झालेला आहे. कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. या अर्जदारां व्यतिरिक्त कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांस आणखीन कोणीही वारसदार नव्हते व नाहीत.

३) कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे मयत पती कै.तुकाराम महादू मुंडकर यांची वडिलोपार्जित खालील कोष्टक (अ) मध्ये नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही शासनाने सिडको नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेली आहे.

**कोष्टक (अ) मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | यु.केस नं. |
|---|---|---|---|---|
| वडघर | १३८ | ६ | ०–५३–६ | ८९ |

तसेच खालील कोष्टक (ब) मधील नमूद कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे मयत पती कै.तुकाराम महादू मुंडकर व इतर यांचे नावे असलेली शेतजमीन सातबारा सदरी शासनाने सिडको नवी मुंबई प्रकल्पांतर्गत संपादनात समाविष्ट अशी नोंद केलेली आहे.

**कोष्टक (ब) मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आ. (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| वडघर | १२९ | १ ब | ०–६१–० | ७.५० |

अर्जदारांचे म्हणणे की, कोष्टक (अ) मधील संपादीत जमिनीच्या बाबत कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर व इतर यांचे नावे सिडकोच्या १२.५ टक्के योजनेनुसार भूखंड मिळणार आहेत. तसेच कोष्टक (ब) मधील भूसंपादनात समाविष्ट असलेल्या शेतजमीन मिळकतीबाबत मिळणारे आर्थिक फायदे किंवा भूखंड तसेच नमुआंवि प्रकल्पांतर्गत पुनर्वसन योजनेमधील वडघर पुष्पक नोड, सेक्टर R1, भूखंड क्रं.३८, क्षेत्र २१० (चौ.मी.) हा भूखंड कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर व इतर यांची नावे भूखंडधारक म्हणून सिडको दप्तरी नोंद झालेली आहे.

४) कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर व इतर यांची वडिलोपार्जित खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत शासनाने सिडको नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेली आहे.

**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | यु.केस नं. |
|---|---|---|---|---|
| वडघर | ४ | ४+५ अ | ०–१४–९ | ३६ |
| | ११ | अ | ०–९–६ | |
| | ११ | ब | ०–२८–३ | |
| वडघर | १०८ | ३ | ०–६३–७ | ३७ |
| | ११४ | २ | ०–२५–० | |
| वडघर | ११८ | १ | ०–५७–४ | १३६ |
| | १२२ | ३ | ०–१६–७ | |
| | १२३ | २ | ०–४०–२ | |
| वडघर | १६० | २ | ०–२०–० | ३६ |
| वडघर | १६० | ३ | ०–४४–६ | ३६ |
| वडघर | १६० | ७ | ०–८५–५ | १८ |

तसेच वरील युनिट केस क्रं.३७ मधील संपादीत जमिनीबाबतच्या १२.५ टक्के योजनेतील सिडकोच्या करंजाडे नोड, भूखंड क्रं.१३, सेक्टर क्रं.२ ए, ता.पनवेल, जि.रायगड या भूखंडावरील कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे नावे असलेली सदनिका आर.एन.एव्हेन्यू बिल्डींग, रुम क्रं.४०५, कारपेट एरिया (चौ.मी.) ३६.९९६, रजि. दस्त क्रं.१६२९६/२०१८ ही आहे.

तसेच ग्रामपंचायत वडघर, चिंचपाडा येथील कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांची मयत आई कै.महादीबाई गोमा केणी व इतर यांचे नावे असलेल्या नमुंआंवि प्रकल्पांतर्गत संपादीत घराचे बाबत वडघर चिंचपाडा भूसंपादन निवाडा / संचिका क्रमांक CHMO-ICIG-184 अशी असून त्याबाबत मिळणारे भूखंड.

४) वर अर्ज / पॅरा ३ तसेच ४ मधील नमूद कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर व इतर यांना नवी मुंबई प्रकल्पांतर्गत संपादीत शेतजमिनीबाबत सिडकोच्या १२.५ टक्के योजनेचे भूखंड मिळणार आहेत तसेच नमुंआंवि प्रकल्पांतर्गत पुनर्वसन योजनेंतर्गत भूखंड व आर्थिक लाभ मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांनी तसा वारस दाखला मिळण्याकरिता दिवाणी चौकशी अर्ज क्रं.१६१४/२०२१ पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतींबाबत अर्जदार हे कै.यमुनाबाई तुकाराम मुंडकर यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १२/११/२०२१ रोजी माझया सही शिक्क्यानिशी दिली.

| | | |
|---|---|---|
| **सही/–**<br>**क.लिपीक**<br>**दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–**<br>**सहा.अधिक्षक**<br>**दि.न्या.व.स्तर, पनवेल** |

# तर मागासवर्गीय घटकांचे प्रस्ताव व सूचना सादर कराव्यात : मंगेश कुडाळकर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



भारतीय संविधानाने समाजातील दुर्बल घटकांना सबल घटकांच्या बरोबरीने विकासाची संधी दिली आहे. याच अनुषंगाने जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय घटकांचे काही प्रस्ताव व सूचना असतील तर त्या तातडीने सादर कराव्यात,असे प्रतिपादन विधान सभा सदस्य तसेच इतर मागासवर्ग कल्याण समिती प्रमुख श्री.मंगेश कुडाळकर यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र विधान मंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती दि.१० ते दि.१२ नोव्हेंबर २०२१ या तीन दिवसीय रायगड जिल्हा दौऱ्यावर आली असून जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित दौऱ्याच्या तिसऱ्या दिवशी समारोपाच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय इतर मागासवर्ग कल्याण समितीचे पदाधिकारी विधानसभा सदस्य श्री.राजू कारेमोरे (तुमसर मतदारसंघ), श्रीमती मंजुळा गावित (साक्री मतदारसंघ), गणपत गायकवाड (कल्याण पूर्व मतदारसंघ), आणि श्री. तानाजी मुटकुळे (हिंगोली मतदारसंघ),मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी अवर सचिव (समिती) घ.ज्ञा. देबडवार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के–पाटील, तहसिलदार विशाल दौंडकर, सचिन शेजाळ हे उपस्थित होते.

या बैठकीत बोलताना इतर मागासवर्ग कल्याण समिती प्रमुख श्री.मंगेश कुडाळकर म्हणाले की, जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे महोदयांनी दिलेल्या सूचनेनुसार रायगडमधील शिवरायांच्या या पावन भूमीत दि.१० ते दि.१२ नोव्हेंबर २०२१ या कालावधीतील तीन दिवसीय दौरा उत्तमरित्या पार पडला.

शासन हे सर्वसामान्यांचे आहे. इतर मागासवर्गीयांसाठी असलेले शासकीय कामकाज गतिमानतेने, योग्य रितीने चालावे, यासाठी ही समिती प्रयत्नशील आहे. या जिल्ह्यात चांगले कामकाज कसे उभे राहील, याचाही प्रयत्न केला जात आहे. आपल्या सूचना व प्रस्ताव तातडीने सादर करावेत, जेणेकरुन त्यावर योग्य तो निर्णय घेता येईल.

संसदीय लोकशाही पध्दतीमध्ये विधानमंडळाच्या विविध समित्या प्रशासनावर संपूर्ण व प्रभावी नियंत्रण तसेच देखरेख ठेवण्याची भूमिका पार पाडीत असतात. शासनाने राबविलेल्या विविध योजनांचा अभ्यास करुन त्यातील त्रुटी शोधून त्या अधिक परिणामकारक व समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत कशा पोहोचविता येतील, याबाबत समिती विधानमंडळ आपल्या अहवालामार्फत शिफारशी करते. महाराष्ट्र राज्य हे देशातील एक प्रगतशील राज्य असून महाराष्ट्रात ५२ टक्के इतर मागासवर्गीय असून या प्रवर्गाकरिता शासनामार्फत कार्यन्वित केलेल्या योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते किंवा कसे, इतर मागासवर्गीयांना शैक्षणिक व वैधानिक संस्था तसेच अन्य क्षेत्रात पर्याप्त प्रतिनिधीत्व किंवा संधी मिळते किंवा नाही, शासकीय पातळीवर अंगीकृत केलेल्या धोरणांची अंमलबजावणी होत आहे किंवा नाही, याची पडताळणी करण्यासाठी तसेच इतर मागासवर्गीयांना सर्व क्षेत्रात पर्याप्त समान संधी उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत उपाययोजना सूचविण्यासाठी ही समिती कार्य करते.

बैठकीच्या शेवटी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी विधानसभा सदस्य तथा समिती प्रमुख श्री.मंगेश कुडाळकर यांचे व इतर समिती सदस्यांचे आभार व्यक्त केले. या बैठकीस दत्तात्रेय ब्यागलवार (सहाय्यक कक्ष अधिकारी),संजय हडकर (लिपिक टंकलेखक), समिती प्रमुखांचे स्वीय सहायक राजेंद्र भानजी, गितेश माने (स्वीय सहाय्यक), प्रतिवेदक श्री.मंगेश कांबळे, श्री.पांडुरंग धुमाळे, जिल्हाधिकारी कार्यालय, परिवहन विभाग, पोलीस विभाग, महावितरण, आदिवासी प्रकल्प, परिवहन इत्यादी शासकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# भेंडखळ येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

समाजात असाही एक घटक आहे. जो एका व्याधीवर संघर्ष करीत आपले जीवन आनंदाने जगत आहे.

या आजाराचे नाव आहे थॅलेसेमिया या आजारातील काही व्यक्तींना दर आठवड्याला, काहींना दर १५ दिवसांनी तर काहींना दर २१ दिवसांनी नवीन रक्त चढवावे लागते. या रूग्णांना वेळेवर रक्त मिळावे म्हणून अन्य संस्था प्रमाणेच घाटकोपर–मुंबई येथील समर्पण ब्लड बँक अनेक वर्षापासून काम करीत आहे. या ब्लड बँकेत जवळपास २०० थॅलेसेमिया रुग्णांची नोंद असुन यातील प्रत्येकाला माफक दरात रक्त देऊन त्यांना नवजीवन देत आहे. एवढी लागणारी रक्ताची गरज ही ब्लड बँक मुंबई आणि परिसरामध्ये सातत्याने रक्तदान शिबिरे आयोजित करून पुर्ण करीत आहे.

या मुलांना सहकार्य करण्याच्या उद्देशाने पालवी सामाजिक संस्था, विजय–विकास सामाजिक संस्था,जरी मरीआई नवरात्र उत्सव मंडळ आणि नवतरुण मित्र मंडळाच्या माध्यमातून रविवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२१ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, भेंडखळ येथे सकाळी ९ ते २ या वेळेत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. थॅलेसेमिया रुग्णांकरीता आयोजित या शिबिरात सर्वांनी सहभागी होऊन रक्तदान करावे. तसेच आपल्या संपर्कातील रक्तदात्यांना या शिबिरात सहभागी करून घ्यावे असे आवाहन पालवी सामाजिक संस्था, विजय–विकास सामाजिक संस्था, जरीमरीआई नवरात्रोत्सव मंडळ, नवतरुण मित्र मंडळ यांनी केले आहे.

# मनसे शहरअध्यक्ष दर्पण दरेकर यांच्या आमरण उपोषणाची सांगता

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



शहरातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणादरम्यान वाहतुकीच्या नवीन समस्या आणि गैरसोयी निर्माण झाल्या असून यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी जाहिर केलेले आमरण उपोषण बुधवार, दि. १० नोव्हेंबर २०२१ पासून सुरू झाल्यानंतर गुरूवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास पोलादपूर तालुक्यातील कोंढवी गावचे भुमीपुत्र आ.मंगेशभाऊ कुडाळकर आणि नागपुर येथील विधानपरिषद सदस्य आ.वंजारी यांच्या मध्यस्थीने उपोषणाची यशस्वी सांगता झाली आहे. यावेळी महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता बांगर यांच्यासोबत आ.मंगेश कुडाळकर यांच्यासोबत चर्चा करून दिली असता बांगर यांनी दर्पण दरेकर यांच्या सर्व मागण्यांना मंजूरी मिळविण्याचे प्रस्ताव सादर करीत असल्याची माहिती दिली.

महाड येथील राष्ट्रीय महामार्ग उपविभागाच्या उपकार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम यांना पोलादपूर शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी मनसेचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष चेतन उतेकर, पंकज उमासरे, दीपक चव्हाण, चंद्रहास नगरकर यांच्यासमवेत भेटून इशारावजा निवेदन दिले. या निवेदनानुसार कोणतीही उपाययोजना न करता इशारा देणाऱ्यास आमरण उपोषणापासून परावृत्त करण्याचे सोपस्कार पूर्ण करण्यासाठी पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये तहसिलदार दिप्ती देसाई यांच्या अध्यक्षतेखाली उपकार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम, कनिष्ठ अभियंता म्हाडकर आणि सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या उपस्थितीत मनसे शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांना मंगळवारी चर्चेस निमंत्रित करून बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी दर्पण दरेकर यांनी श्रीकाळभैरवनाथ देवस्थानासमोर दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी तसेच गुरे जनावरे यांच्यासाठी व्हेईक्युलर अथवा कॅटल अंडरपास उभारण्याची मागणी केली. यावेळी मंजूरीविना पुल उभारणाऱ्या ठेकेदार कंपनी आणि कंपनीच्या आर्थिक कामावर लक्ष ठेवणाऱ्या कंपनीला काळ्या यादीत टाकण्याच्या मागणीबाबत कनिष्ठ अभियंता म्हाडकर यांनी विषयांतर करू नका, असा आग्रही सूर धरला. मात्र, कोणतेही समाधान न करताच राष्ट्रीय महामार्ग उपविभागाच्या उपकार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम यांनी परावृत्त करण्याचा असफल प्रयत्न करून सोपस्कार पूर्ण केल्याने मनसे शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी आमरण उपोषणाच्या इशाऱ्यानुसार बुधवारी सकाळी साडेअकरा वाजल्यापासून सुरूवात केली. गुरूवारी दुपारी पोलादपूर शहरामध्ये महाराष्ट्र विधानमंडळाच्या समितीमध्ये आ.मंगेशभाऊ कुडाळकर हे पोलादपूरचे भुमिपुत्र असल्याची माहिती मिळताच जनतेच्या या प्रश्नाबाबत मनसेचे शहरअध्यक्ष दर्पण दरेकर हे उपोषणास बसल्याची माहिती प्रस्तुत प्रतिनिधी यांनी दिली. यावेळी पक्षनिवेश न बाळगता जनतेच्या गैरसोयी दूर करण्याचा आग्रह लक्षात घेऊन समितीची बैठक संपल्यानंतर आ.मंगेशभाऊ कुडाळकर आणि नागपूरचे विधानपरिषद सदस्य आ.वंजारी यांनी उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी मनसेचे नेते इरफान धामणकर, प्रभातनगरचे अध्यक्ष राजा दिक्षित, दीपक उतेकर, प्रवीण महाडीक, योगेश सकपाळ, ओंकार मोहिरे, प्रवीण पांडे, आदेश गायकवाड, निखील वनारसे, अखिलेश शिंदे, सूरज जगताप, किरण जगताप, आदित्य गायकवाड, गणेश जांभळेकर, विनायक दाभेकर तसेच अनेक ग्रामस्थ तसेच सर्वपक्षिय कार्यकर्ते उपस्थित होते.

# संक्षिप्त...

## मंगेश मेस्त्री यांची छावा संघटनेच्या दक्षिण रायगड जिल्हा संघटक पदी निवड

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

माणगांव येथील मंगेश मेस्त्री यांची रायगड जिल्हा अध्यक्ष, राजू सुतार यांच्या हस्ते निवड करण्यात आली.

यावेळी उपस्थित कार्यअध्यक्ष निलेश भाई महाडीक, कोलाड शहर अध्यक्ष ईकिंदर शेवाळे, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष रूपेशजी कांबळे, दक्षिण जिल्हा सचिव सुनिल शिदें, यांच्या उपस्थित सोहळा पार पडला. निजामपूर शहरातील व माणगांव तालुक्यातील मंगेशशेठ मेस्त्री हे एक प्रसिद्ध जानता, मनमिळाऊ व वेळ प्रसंगी धावुन जाणारा गरीबी व बेरोजगाराची जाण असणारा, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात ठसा निर्माण करणारा अल्पावधीतच नावारुपास आलेला हा कार्यकर्ता असुन त्यांच्या या निवडीबद्दल सर्व मित्र व पदाधिकारी यांनी अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पेण शहर अध्यक्ष पदी रुपेश पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पेण शहर अध्यक्ष पदी रुपेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॅशिंग नेतृत्व म्हणून युवा वर्गात प्रसिद्ध असलेल्या रुपेश पाटील यांच्या नियुक्तीने रायगड जिल्ह्यासह पेण तालुक्यातील युवा वर्गात आनंदाचे वा-तावरण पसरले आहे. रुपेश पाटील यांना मनसे संस्थापक राज ठाकरे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन नियुक्त करण्यात आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गेली १२ वर्ष मनसे वाढीसाठी प्रयत्न करणाऱ्या रुपेश पाटील यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पेण शहर अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून आपल्यावर देण्यात आलेली जबाबदारी स्विकारून युवा वर्गासह जेष्ठ व सर्व सामान्य वर्गाला समान न्याय देण्यासाठी प्रयत्न करीत राहणार. तसेच सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करून पक्ष बळकटीसाठी तन-मन-धनाने काम करणार असल्याचे मनसे नवनियुक्त पेण शहर अध्यक्ष रुपेश पाटील यांनी पत्रकारांबरोबर बोलताना सांगितले


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# रायगड जिल्ह्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविणार : सुभाष देसाई

**दै.रायगड नगरी । पेण**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड जिल्ह्यात लवकरच स्वयंरोजगार निर्मिती साठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविणार तर पेणवर शिवसेनेचा भगवा फडकणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी पेण येथील विधानसभा कार्यकर्ता मेळावा आणि जाहीर पक्षप्रवेश कार्यक्रमात केले. तसेच झालेल्या पक्षप्रवेशातून घर तेथे शिवसैनिक ही पक्षाची घोषणा पेण तालुक्यात प्रत्यक्षात उतरत असल्याचे स्पष्ट केले.



या मेळाव्याला शिवसेना संपर्क नते तथा राज्याचे उद्योग मंत्री सुभाष देसाई जिल्हाप्रमुख आमदार महेंद्र दळवी, माजी जिल्हा प्रमुख विष्णुभाई पाटील, संपर्कप्रमुख विलास चावरी, सल्लागार बबन पाटील, राजिपचे विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, अलिबाग तालुकाप्रमुख राजा केणी, पेण तालुका प्रमुख अविनाश म्हात्रे, शहर प्रमुख सुधाकर म्हात्रे, माजी उपजिल्हाप्रमुख राजेंद्र राऊत, महिला आघाडीच्या दिपश्री, पोटफोडे, वाहतूक सेनेचे दिलीप पाटील, युवासेना जिल्हाधिकारी सुधीर ढाणे, चेतन मोकल उद्य-ोजक रशाद मुजावर, नरेश सोनवणे आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पेण तालुका सचिव नामदेव पाटील यांच्यासह त्याच्या समर्थकांनी शिवसेनेत प्रवेश केला.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे कोरोना काळात जनतेचे कार्य करताना कुठेच डगमगले नाहीत आणि याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे सुप्रिम कोर्ट जागतिक आरोग्य संघटनेने धारावी सारख्या भागात कोरोनाचा फैलाव थांबविण्यात यश मिळविल्याबाबत राज्याचे कौतुक केले हे आहे, तर प्रसारमाध्यमांच्या सर्व्हेमध्ये देखील देशातील सर्वोत्तम मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांना पसंती दिल्याचे जाहीर झाले आहे. पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी माझी वसुंधरा ही योजना राबवून कोरोना काळातही झाडे वाचविण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम केले,चळवळी राबविल्या याबाबत देखील पर्यावरण विषयी जागतिक परिषदेत झाडांचे रक्षण करणारा हा महाराष्ट्र राज्य म्हणून घोषित झाल्याने आपल्या राज्याच्या शिरपेचात मनाचा तुरा रोवला गेला असून ही राज्यासाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे. असे देखील उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले.तर दीड वर्षात कधी नव्हे ती शेतकरी आणि आपत्तीग्रस्तांना राज्य शासनाने दीड लाख कोटींची भरभरून मदत दिली हे प्रथमच घडले आहे आणि याबाबत जनता संतुष्ट आहे असे सांगून लवकरच मराठी भाषेचा मान राखून मरीन ड्राईव्ह येथे मराठी भाषा भवन उभारण्यात येणार असून सरकार स्थापन झाल्या झाल्या राज्यातील सर्व भाषिक शाळांमध्ये मराठी भाषेचा विषय सक्तीचा करण्याचा कायदा करणारा एकमेव मुख्यमंत्री आहेत असे सांगितले.

उद्योग व्यवसायाच्या बाबत उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी बोलताना उद्योग विभागामार्फत कोरोना काळात देखील न थांबता जगातील ६० कंपन्यांबाबत करार करून महाराष्ट्रातील बेरोजगारी दूर करण्यासाठी बरेचसे उद्योग आणले जात आहेत. त्यामध्ये कोकणात जास्तीत जास्त उद्योग येत आहेत. रायगड जिल्ह्यात अप्रतिम असे औषध उद्योग देखील उभारण्यात येत असून आणि माणगाव येथे आधुनिक एमआयडीसी उभारण्यात येत असल्याने रायगड जिल्ह्यातील रोजगाराचा प्रश्न सुटणार आहे. जिल्ह्यात येत्या काळात बाळासाहेब ठाकरे रोजगार मेळावा देखील घेतला जाणार असून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देखील दिले जाणार आहे. शिवसे-नेचे भूमीपुत्रांविषयी असणारे धोरण लक्षात घेता कोणत्याही कंपनीत ऐंशी टक्के नोकऱ्या मिळेपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही, जी कंपनी टाळाटाळ करेल त्यांना वठणीवर आणल्याशिवाय आम्ही शांत राहणार नाही असे सांगून उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी राज्यातील कंपन्यांना रोजगाराच्या बाबतीत एकप्रकारे इशाराच दिला आहे.

येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुका या शिवसेनेसाठी अस्तित्वाची लढाई असून सर्वांनी मतभेद दूर करून एकत्र येऊन काम करा. जिल्हा परिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकविण्याची क्षमता आपल्यात आहे असे आमदार महेंद्र दळवी यांनी या वेळी सांगितले.

## मुरुडमध्ये एस टी कर्मचाऱ्यांच्या संपाला मनसेचा पाठिंबा



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

राज्यात एस टी कर्मचा-यांच्या संपाला आज पाचवा दिवस असून शासनात विलिनीकरण व्हावे.या मागणी साठी कर्मचारी ठाम आहेत.

एस.टी.कर्मचा-यांच्यांच्या संपाला विविध राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला असून आज महाराष्ट्र नवनिर्माण से-नेचे राज्य परिवहन कर्मचारी सेना (मुरुड आगार) तालुका अध्यक्ष राजेश तरे यांनी मुरुड आगारातील संपकरी एसटी कर्मचारी यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या ऐकून घेऊन ७ व्या वेतन आयोग व विलीनीकरण या भूमिकेवर ठाम राहण्याचे सांगितले तसेच कोणत्याही परिस्थितीतीत महाराष्ट्र नवनिर्माण राज्यपरिवहन कर्मचारी सेना कायम तुमच्या पाठीशी असल्याचे आश्वासन देऊन संप करी कर्मचाऱ्यांना मानसिक आधार देऊन त्यांचे मनोबल वाढविले.यावेळी शैलेश खोत,अरविंद गायकर महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## महाराष्ट्र विधानमंडळ इतर मागासवर्गीय कल्याण समितीचा रायगड दौरा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाराष्ट्र विधानमंडळ इतर मागासवर्गीय कल्याण समितीचा रायगड दौरा आज पोल-ादपूर तालुक्यात आला असता या दौऱ्यात विधानमंडळाचे प्रतिनिधीत्व पोलादपूर तालुक्यातील कोंढवी गावाचे भूमिपुत्र आ.मंगेश कुडाळकर आणि विधानपरिषद सदस्य आ.वंजारी यांनी केले.



पोलादपूर शहरातील ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ देवस्थानामध्ये दर्शन घेतल्यानंतर मुंबई-कुर्ला विधानसभा मतदार संघाचे आ.मंगेश कुडाळकर व विधानपरिषद सदस्य आ.वंजारी यांनी पोलादपूर नगरपंचायतीच्या कार्यालयाची पाहणी केली. यावेळी नगरपंचायतीच्या प्रशासक तसेच महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व कर्मचारी यांनी पोलादपूर नगरपंचायतीच्या विकासासंदर्भातील माहिती आ.मंगेश कुडाळकर यांना दिली.

यावेळी प्रशासक तथा महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी पोलादपूर नगरपंचायतीम ध्ये गेल्या १० महिन्यांपासून प्रशासक असल्याची माहिती देऊन अतिवृष्टीकाळात तसेच तत्पूर्वी अनेक विकासकामे सुरू असल्याचे सांगितले.

यानंतर पोलादपूर शहरातील कॅप्टन विक्रम राव मोरे सभागृहामध्ये आ.मंगेश कुडाळकर आणि आ.वंजारी यांनी इतरमागासवर्गीय कल्याण समितीच्या गोपनीय कामकाजासंदर्भात अहवाल तयार करण्याकामी उपस्थित अधिकाऱ्यांकडे प्रशासन व विविध विभागातील इतर मागासवर्गीय शासकीय कर्मचाऱ्यांची सद्यस्थिती तसेच रिक्त पदे याबाबत माहिती घेऊन आतापर्यंत रिक्त पदांच्या पूर्ततेसाठी प्रस्ताव करण्यात आले अथवा कसे याबाबत सविस्तर आढावा घेतला.

याप्रसंगी महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, पेणचे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, पोलादपूर तहसिलदार दिप्ती देसाई, नायब तहसिलदार शरद आडमुठे, नायब तहसिलदार समीर देसाई, सहायक गटविकास अधिकारी तसेच समाजकल्याण आणि इतर मागासवर्गीय महामंडळ आणि विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी शिवसेना पक्षसंघटनेतर्फे तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे तसेच रायगड जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, पंचायत समिती सदस्य यशवंत कासार आदींनी आ.कुडाळकर आणि आ.वंजारी यांचे स्वागत केले.

# वाहतूक नियमांचे पालन करत अपघात होणार नाही याची काळजी घ्या : एस.डी. कमलाकर

### नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयात कायदेविषयक शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । वाकण**

विना लायसन्स गाडी चालवणे अथवा दुसऱ्याला लायसन्स नसताना गाडी देणे, दुचाकी, चारचाकी वाहनांचा विमा नसताना वाहन चालवणे अथवा दुसऱ्यांना चालवण्यासाठी देणे हे गंभीर गुन्हा असून त्यासाठी जबर शिक्षेची तरतूद केलेली आहे. तसेच दुचाकी चालवताना हेल्मेट न वापरणे किंवा चारचाकी वाहनातून प्रवास करताना सीट बेल्ट न वापरणे हाही गुन्हा आहे. त्यामुळेच वाहतूक नियमांचे पालन करत अपघात होणार नाही याची काळजी घ्या असे बहुमोल मार्गदर्शन रोहा येथील कनिष्ठ स्तर दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश एस.डी. कमलाकर यांनी केले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्याकडील निर्देशाप्रमाणे दि. २ ते १४ नोव्हेंबर या दरम्यान भारतभर जागरूकता अभियान व पोहोच कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे सूचित करण्यात आले होते. त्याच अनुषंगाने दिवाणी न्यायाधीश क-स्तर रोहा तथा तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष यांनी नागोठणे ग्रामपंचायत येथे भारतभर जागरुकता अभियान व पोहोच कार्यक्रमाअंतर्गत नागोठणे ग्रामपंचायत हद्दीतील महिला बचत गट व नागरिकांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन दि.१२ रोजी नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयातील सभागृहात करण्यात आले होते. यावेळी न्यायाधीश एस.डी.कमलाकर यांनी उपस्थित बचत गटातील महिलांना नागरिकांना मोलाचे असे मार्गदर्शन केले. तसेच यावेळी ॲड. दिव्या सावंत यांनी उपस्थितांना कामगार कायद्याविषयी जागरूकता व्हावी यासाठ महत्वपूर्ण माहिती सांगितली. याचबरोबर ॲड. स्वराज मोरे यांनी उपस्थितांना मोटार वाहन कायदेविषयक मार्गदर्शन करताना मूलभूत कर्तव्याची जाणीव करून दिली.

नागोठणे ग्रामपंचायत सभागृहात आयोजित या कार्यक्रमास नागोठणे सरपंच डॉ.मिलिंद धात्रक, पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर ,ग्रामविकास अधिकारी मोहन दिवकर, सदस्य सुरेश जैन, ज्ञानेश्वर साळुंके, सदस्या कल्पना टेमकर, भक्ती जाधव, महिला बचत गटाच्या अध्यक्षा व सदस्य, नागोठणे पोलिस ठाण्याचे कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते.

अपघात का होतात याचे कारण स्पष्ट करतांना न्यायाधीश एस.डी. कमलाकर यांनी सांगितले की, चालकाच्या चुकीमुळे, अतिवेगाने गाडी चालवणे, मद्यपान करून गाडी चालवणे याचबरोबर रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत अतिवेगाने गाडी चालवणे तसेच सुरक्षेचे नियम मोडत गाडी चालवणे यामुळे रस्ते अपघात होत घडत असतात. आपण सर्वांनीच सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतुकीची सर्व नियमांचे पालन केले तर अपघात होणारच नाही.अपघात होऊ न देणे हाच समस्येवरचा उपाय आहे. अपघात नाही घडले तर अनेकांना आपले प्राण गमवावे लागणार नाहीत. महामार्ग पोलिस व वाहतूक पोलिस आपापल्या परीने अनेक उपक्रम राबवत अपघात रोखण्यासाठी प्रयत्नशील असतात.

यांच्या बरोबरीने नागरिकांनी देखील अपघात रोखण्यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. त्यामुळे अपघात रोखण्यासाठी सर्वांनीच प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. असे झाल्यास अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या नियंत्रण ठेवता येईल किंबहुना शून्यावर देखील येईल.वाहतुकीचे नियम का दिलेत तर या नियमांचे पालन झाले तर वाहतूक सुरळीत सुरक्षित होईल असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



### जिल्ह्यातील कोविड-१९ लसीच्या दुसऱ्या डोसनंतर पूर्ण झालेल्या आणि १४ दिवस उलटून गेलेल्या

# ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरीक आणि गर्भवती महिलांना सर्व धार्मिक स्थळे आणि प्रार्थनास्थळांना भेट देण्याची परवानगी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील आदेशान्वये महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेशान्वये लागू केलेले निर्बंध शिथील करण्याबाबत अधिसूचनेनुसार सुधारीत निर्देश लागू करण्यात आलेले आहेत.

शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील मार्गदर्शक सूचनाच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्याच्या हद्दीत पुढील आदेश होई पर्यंत यापूर्वी लागू केलेल्या निर्बंधामध्ये दि.०७ ऑक्टोबर २०२१ पासून प्रतिबंधीत (Containment Zone) क्षेत्राबाहेरील धार्मिक स्थळे प्रार्थनास्थळ सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील आदेशान्वये कोविड-१९ लसीच्या दुसऱ्या डोसनंतर पूर्ण झालेल्या आणि १४ दिवस उलटून गेलेल्या ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरीक आणि गर्भवती महिलांना या आदेशाच्या तारखेपासून सर्व धार्मिक स्थळे आणि प्रार्थनास्थळांना भेटण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र ही परवानगी फेस मास्क घालणे, सोशल डिस्टन्सिंग, थर्मल स्कॅनिंगची तरतूद आणि हात धुणे किंवा सॅनिटायझर अनिवार्य असेल. धार्मिक स्थळे/प्रार्थना स्थळे खुला करण्याबाबत शासनाकडील दि.२४ सप्टेंबर २०२१ सोबतचे मानक कार्यप्रणाली मधील इतर सर्व अटी व शर्ती कायम ठेऊन मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे आवश्यक आहे.

त्यानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड, तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी साथरोग अधिनियम, १८९७ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० प्राप्त अधिकारान्वये रायगड जिल्ह्यातील कोविड-१९ लसीच्या दुसऱ्या डोसनंतर पूर्ण झालेल्या आणि १४ दिवस उलटून गेलेल्या ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरीक आणि गर्भवती महिलांना सर्व धार्मिक स्थळे आणि प्रार्थना स्थळांना भेट देण्याची परवानगी देण्यास मान्यता दिली आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती/आस्थापना शासनाने यापूर्वी लागू केल्यानुसार दंडात्मक कारवाईस तसेच भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, २६९, २७०, २७१ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम ५१ सह अन्य तरतुदीनुसार फौजदारी शिक्षेस पात्र राहील, असेही जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आदेशित केले आहे.

## मुरुड तालुक्यात मतदार यादी विशेष पुन:रिक्षण कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । मुरुड**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि.१-१-२०२२या अर्हता दिनांकानुसार आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनः रिक्षण कार्यक्रम घोषित केला आहे तसेच दि.१-११-२०२१ ते दि.३०-११-२०२१ या कालावधीत दि.१-१-२०२२रोजी वयाची १८ वर्षे पुर्ण होणा-या मतदारांची नोंदणी करण्यात येणार आहे. याकरीता दि.१३ व दि.१४ नोव्हेंबर २०२१ व दि.२७ व दि.२८ नोव्हेंबर २०२१ रोजी मुरुड तालुक्यात विशेष मोहीम आयोजित करण्यात आली आहे.विशेष मोहिमेच्या कालावधीत प्रत्येक मतदान केंद्रावर मतदार नोंदणी शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. तरी तालुक्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी मतदान केंद्रावर भेट देऊन त्यांचे नाव मतदार यादीत नोंदविण्याकरीता नमुना नंबर ६ भरून द्यावा. दि.१६ नोव्हेंबर २०२१ रोजी मतदार यादी मधील नोंदणी मध्ये दुरुस्ती,नाव वगळणी तसेच नवीन नाव नोंदणी इ. प्रक्रिया गावातील नागरिकांपर्यंत सुलभतेने पोहोचविण्याकरीता विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी मुरुड तालुक्यातील जास्तीत जास्त मतदारांनी सदर ग्रामसभेला उपस्थित राहावे. असे आवाहन मुरुड तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी गोविंद वाकडे यांनी केले आहे.

## नूतन कार्यालयाचे प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

ॲड.सिमा मंगेश भोईर व ड .शिला संतोष सपकाळ यांच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी करून शुभेच्छा दिल्या. यावेळी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.मनोज भुजबळ, ॲड.सिमा भोईर, ॲड. शिला सपकाळ, मंगेश भोईर, संतोष सपकाळ, सुजित गुळवे आदी उपस्थित होते.